क्र.साप्रवि/मभाक/न.क्र. ७१(चार)/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
*मुंबई - ४०० ०१९.*

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

## प्रशासकीय परिपत्रक क्र. १७४ दिनांक १९ /०९ / २००८

विषय : शासन व्यवहारात वापरण्याचे रबरी ठसे व मुद्रा मराठीत असण्याबाबत.

संदर्भ : सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.मभावा-२००८/२५७/प्र.क्र.४६/ ०८/२०-ब, दिनांक १६/०४/२००८.

----------

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ व त्याखाली करण्यात आलेल्या विनियमानुसार काही वर्जित प्रयोजने वगळता सर्व दैनंदिन कामकाज मराठीतून करण्याबाबतच्या सूचना यापूर्वी वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रक/प्रशासकीय परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत.

२. शासनाच्या आता असे निदर्शनास आले आहे की कार्यालयीन पत्रे/परिपत्रके निर्गमित करताना त्यावर मराठी व्यतिरिक्त अन्य भाषेतील रबरी ठसे/मुद्रा यांचा वापर करण्यात येतो. सदर बाब ही गंभीर असल्याचेही शासनाने नमूद केले आहे.

३. या संदर्भात कक्ष अधिकारी उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण-२००८/सं.क्र.७९८/प्रशा-४, दि. ०५/०५/२००८ च्या पत्रासोबत प्राप्त झालेल्या सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या संदर्भिय परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे.

४. सर्व संबंधितांना विनंती करण्यात येते की सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १६/०४/२००८ च्या उपरोक्त परिपत्रकातील सूचनांचे अवलोकन करून प्रशासकीय कामकाजातील रबरी ठसे व मुद्रा मराठीत वापरण्याची दक्षता घ्यावी.

सोबत : वरीलप्रमाणे

*(सु. य. पाटील)*
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रत : महावितरण कंपनीच्या उप विभागीय व त्यावरील सर्व कार्यालयापर्यंत.

C:*Marathi* Cell\Adm.Cir.No.110 Stamp.doc

१/५

महावितरण मुंबई
सामवि ८ र.व.का.
आवक/जावक
नंबर: ०११५
दिनांक: ९/७/०८

ED/HR/2273
Date 12/6/08

महाराष्ट्र शासन

मध्यवर्ती आवक विभाग
आवक क्रं. 1334
दिनांक 6/6/08

क्र.संकीर्ण-२००८/प्र.क्र.१०५/ऊर्जा-२,
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २९ मे,२००८.

प्रति,

व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित,
प्रकाशगड,वांद्रे (पूर्व),मुंबई ४०० ०५१.

व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
प्रकाशगड,वांद्रे (पूर्व),मुंबई ४०० ०५१.

व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित,
प्रकाशगंगा,वांद्रे (पूर्व),मुंबई ४०० ०५१.

सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.मभावा-२००८/२५७/प्र.क्र.४६/०८/२०-ब, दि.१६.४.२००८ ची प्रत माहिती व योग्य त्या उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

(मोहन मल्हार कामे)
शासनाचे अवर सचिव

शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा वापर
शासन व्यवहारात वापरण्याचे रबरी ठसे व मुद्रा
मराठीत असण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक:- मभावा-२००८/२५७/प्र.क्र.४६/०८/२०-ब,**
**मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :१६.४.२००८.**

**पहा :-** १) शासन परिपत्रक क्र.मभावा-१०६७/७०७-म,दि.३१ मे,१९६७
२) शासन परिपत्रक क्र.मभावा-२००७/२९(मुमं)/प्र.क्र.६१/०७/२०-ब.
दि.१५.११.२००७.

## शासन परिपत्रक

शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा वापर करण्यासंदर्भात शासनाने वेळोवेळी आदेश/परिपत्रके निर्गमित केलेली आहेत. त्यानुसार वर्जित प्रयोजनाव्यतिरिक्त सर्व शासकीय कामकाज मराठीतून करणे आवश्यक आहे. पत्रव्यवहार मराठीत करीत असताना छोटया छोटया बाबीसुध्दा महत्वाच्या असतात. जशा शासन निर्णय/पत्र/परिपत्रके इ.वर नमूद करण्यात येणारा क्रमांक/दिनांक तसेच शासन निर्णय/पत्र/परिपत्रके निर्गमित करताना वापरण्यात येणारे ठसे व मुद्रा या मराठीतूनच असणे आवश्यक आहे.

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की,काही अधिकारी ,काही कार्यालये यांच्याकडून शासन निर्णय/पत्र/परिपत्रके निर्गमित करताना त्यावर मराठी व्यतिरिक्त अन्य भाषेतील रबरी ठसे/मुद्रा यांचा वापर करतात ही बाब अत्यंत गंभीर आहे. शासनाच्या दैनंदिन कामकाजाची भाषा म्हणून मराठीचा वापर करण्यासंबंधात महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ नुसार दि.१.५.१९६६ पासून या विषयावर वेळोवेळी अधिसूचना/शासन निर्णय निर्गमित केलेले असूनही शासकीय कामकाज मराठीतून करण्याऐवजी या-ना त्या सबबीवर इंग्रजीतून वा अन्य भाषेतून काम करावयाचे किंवा रबरी ठसे व मुद्रांचा वापर करावयाचा अशी वृत्ती आढळते.

ज्या अधिकाऱ्यांवर शासनाची धोरणे राबविण्याचे व त्यांची अंमलबजावणी आस्थेवाईकपणे व परिपूर्णतेने होते किंवा नाही याची दखल घेण्याचे दायित्व आहे अशा सर्व शासकीय अधिका-यांनी त्यांच्या त्यांच्या विभागात वा कार्यालयात शासनाचे सर्व कामकाज (वर्जित प्रयोजने वगळून) मराठीतून चालते व चालेल इकडे कृपया लक्ष पुरवावे. तसेच विभागात लागणा-या वेगवेगळया नोंद वहया/पत्रांवर उमटविण्यात येणारे रबरी ठसे व मुद्रा सुध्दा मराठीतूनच असतील याची दक्षता घ्यावी .

सर्व संबंधित अधिका-यांनी त्यांच्या आवश्यकतेनुसार संचालक,शासकीय मुद्रण व लेखन सामग्री संचालनालय यांच्याकडून रबरी ठसे व मुद्रा उपलब्ध करुन घ्यावेत.

संचालक,,शासकीय मुद्रण व लेखन सामग्री संचालनालय यांनी सर्व शासकीय कार्यालयांना त्यांच्या मागणीनुसार लेखन सामग्री,वेगवेगळे ठसे/दिनांकांचे शिक्के मराठीतूनच उपलब्ध करुन द्यावेत.

सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या नियंत्रणाखालील विभागीय,जिल्हा व तालुका पातळीवरील सर्व शासकीय कार्यालयांमधील कामकाज शासनाच्या मराठीविषयक धोरणानुसार करण्यात येत असल्याची खातरजमा करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

सही/-
**(स्मि.द.मंत्री)**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा. मुख्य सचिव/अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,